# कविता

ही उभी आडवी
वाकडी तिकडी
इथून तिथून झालेली
नजाकतपूर्ण चिरफाड
खरोखरच परत परत
हे शरीर कोंबलं जातंय
या कचकड्याच्या
बंदिस्त घर नावाच्या पेटीत
इथं गिल्टी वाटतं मला
स्वतःच्या निर्लज्ज अस्तित्वाची
किळस येते.
ऐन तारुण्यातलं
दगड भिरकवावा
तसं फाइव्हस्टार आलिशान हॉटेल
ते झोपडपट्ट्यातल्या
पाच ढांगांच्या घरातलं
उमेदीतलं आयुष्य.
हातभट्टी ते ब्लडीमेरीचे धबधबे
कशाचाच कशाला मेळ नसलेली
सिग्रेटींच्या धुराची वलयं
शून्यातच आध्यात्मिक मुक्ती
शोधायला नकार देणारं पोट
स्वस्तातला पोटभर भेळभत्ता
कुठल्याही व्यवस्थेला शरण न जाता
वापरलेलं हे सदतीस किलोचं शरीर
आता मृत्यूकडे झोकून देताना
या मेंदूत उमटलेल्या
प्रिय कविते
मला शेवटपर्यंत
स्वतःशी प्रामाणिक असू देत.

**–अरुणचंद्र गवळी**